२५७

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## सार्वजनिक आरोग्य अभियंता (ड्रेनेज विभाग) कार्यालय

जा.क्र. - सा.आ.अ./ज.नी./८५८ दिनांक - २८/०९/२०१८ टिपणी पान क्र. – १

टिप्पणी

मा.सविनय सादर...

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना **मंजूर मक्तेदार दास ऑफ़शोअर इंजि.प्रा.लि. मुंबई यांना वर्कऑर्डर देणेंबाबत.**

संदर्भ-

१) मा.मुख्य अभियंता, मजीप्रा,पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(पुणे)/तांशा ३/सोलापूर/अमृत भुगयो/१७०३ दि.१८/०९/२०१७ (तांत्रिक मान्यता रू. १८०.२४ कोटी)

२) शासन निर्णय क्र. - अमृत-२०१७/प्र.क्र.४२९/नवि-३३ दि.२५/०९/२०१७. (प्रशासकीय मान्यता)

३) सोमपाचे दि.१४/१०/२०१७ रोजीचे ई - निविदा बाबतचे जाहिर प्रसिध्दिकरण.

४) मा. पां. जो. जाधव, सहसचिव, महाराष्ट्र शासन, यांचे क्र.अमृत-२०१८/प्र.क्र.७७/नवि-३३, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई दि.२०/०२/२०१८ रोजीचे पत्र.

५) मा. आयुक्त यांचे जा.क्र.साआअ/जनि/१३३९ दि.२६/०२/२०१८ चे मान्यतेने दि.२६/०२/२०१८ रोजी उघडणेंत आलेला वित्तीय लिफ़ाफ़ा.

६) सोमपा कडून सर्वात कमीचे दर देणारे मक्तेदार L-१ - दास ऑफ़शोअर इंजि. प्रा. लि. मुंबई यांना दि.२७/०२/२०१८ रोजीचे वाटाघाटी करणेकरिता दिलेले पत्र.

७) मक्तेदार दास यांचेकडून दि.२७/०२/२०१८ रोजीने अंतिम वाटाघाटी करणेकरिता दिलेले पत्र.

८) मा. आयुक्त यांची दि.१४/०३/२०१८ ने मक्ता मंजुरीस मान्यता.

९) मा. सर्वसाधारण सभेची ठराव क्र. १ दि.०७/०४/२०१८ ने मक्ता मंजुरीस मान्यता.

१०) मा. पां. जो. जाधव, सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस जा.क्र.साआअ/जनि/३० दि.०९/०४/२०१८ ने राज्यस्तरिय तांत्रिक समिती (SLTC) यांचेकडेस अंतिम मान्यतेस्तव सादर केलेला प्रस्ताव.

११) श्री. संतोष अर्जुन कांबळे विरुध्द सोमपा व इतर यांचे रिट पिटीशन क्र.५७०२/२०१८ मधील दि.२६/०९/२०१८ रोजी मे. उच्च न्यायालयाने वर्कऑर्डर देणेंस असलेली स्थगिती (स्टे) उठविलेबाबतचे दिलेले निर्णय बाबत सो.म.पा. चे हायकोर्ट पॅनेल ॲड. धनुरे यांचे दि.२६/०९/२०१८ रोजीचे ई मेल.

१२) निलेश पोतदार, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे क्र. अमृत-२०१८/प्र.क्र.१७५/नवि-३३, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२६/०९/२०१८ रोजीचे मान्यता पत्र.
(राज्यस्तरीय तांत्रिक समिती - SLTC - मान्यता निर्णय)



Scanned by CamScanner

२५८

टिपणी पान क्र. – 2

विषयांकित नमूद प्रकरणीं संदर्भ क्र. १ ते ३ यांस अनुसरुन सोमपाकडून केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार या र.रु.१८०.२४ कोटी प्रकल्प खर्चाचे योजनेस शासनाकडून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या योजनेतील स्थापत्य कामाचे र.रु.१७४,३८,४५,९८५/- रकमेचे सो.म.पा. कडून ई - निविदा मागविणेंत आलेले होते.

तसेच संदर्भ क्र. ४ ते ८ अन्वये मा. शासनाकडील आदेशांस अनुसरुन सो.म.पा. कडून रितसर निविदा कार्यवाही करणेंत आलेली असून त्यांमध्ये सर्वात कमीचे दर देणारे मक्तेदार L१ - दास ऑफ़शोअर इंजि. प्रा. लि. मुंबई यांनी भरलेले निविदे मधील मक्त्याच्या रकमेच्या २.७०% कमी दराने मक्ता मंजूर करणेत आलेला आहे. त्यास संदर्भ क्र. ९ अन्वये सो.म.पा.चे मा. सर्वसाधारण सभेची ठराव क्र. १ दि.०७/०४/२०१८ ने मक्ता मंजुरीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानंतर संदर्भ क्र. ४ चे मा. पा. जो. जाधव यांचे दि.२०/०२/२०१८ चे पत्रात नमूद केलेंनुसार, सदरचा मा. सर्व साधारण सभेचा ठराव व मक्ता मंजुरीची मूळ नस्ती मा. पां. जो. जाधव यांचेकडेस संदर्भ क्र. ९ अन्वये दि.०९/०४/२०१८ रोजी राज्यस्तरिय तांत्रिक समिती (SLTC) यांचेकडेस अंतिम मान्यतेस्तव सादर करणेंत आलेले होते. यांनुसार सदर SLTC ची मान्यता मिळालेनंतर मंजूर मक्तेदार दार ऑफ़शोअर इंजि. प्रा. लि. मुंबई यांचे समवेत रितसर करारपत्र करुन त्यांना सोमपा कडून वर्कऑर्डर देणेंत येणार होती.

परंतु दरम्यानचे कालावधीत संतोष अर्जुन कांबळे यांनी सो.म.पा. व इत्र विरुध्द मे. उच्च न्यायालयातून रिट पिटीशन क्र.५७०२/२०१८ दाखल केली. त्यांमध्ये मे. उच्च न्यायालयाकडून मंजूर मक्तेदार दास यांना वर्कऑर्डर देणेंस स्थगिती (स्टे) देणेंत आला. त्यांमुळे शासनाकडील SLTC कडून वर नमूद केलेंनुसार अंतिम मान्यता देणेंत आलेली नसलेने सोमपा कडून मंजूर मक्तेदार दास यांना वर्कऑर्डर देणेंत आलेली नाही. परंतु सध्या मे. उच्च न्यायालयात सो.म.पा. कडून सदर केस संदर्भात वेळोवेळी सुनावणी झालेली असून सध्या संदर्भ क्र. ११ अन्वये दि.२६/०९/२०१८ रोजी मे. उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी अंती मे. उच्च न्यायालयाने वर्कऑर्डर देणेस दिलेली स्थगिती (स्टे) उठविणेत आलेली आहे. याबाबत सो.म.पा. चे हायकोर्ट पॅनेल ॲड. धनुरे यांनी दि.२६/०९/२०१८ रोजी ई मेल दिलेला आहे.

त्यांनुसार संदर्भ क्र. १२ अन्वये राज्यस्तरिय तांत्रिक समिती (SLTC) कडून सदर अमृत ड्रेनेज प्रकल्पाच्या स्थापत्य कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत सोमपाने केलेल्या ठरावास मान्यता देणेंबाबतचा निर्णय झालेला आहे. याप्रकारे निलेश पोतदार, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे दि.२६/०९/२०१८ रोजीचे पत्र सोमपा कडे प्राप्त झालेले आहे.

E:\Hibare 18 a\Amrut\Stnd\SD MC 1.doc

Scanned by CamScanner

२५८

टिपणी पान क्र. – 3

तरी या सर्व बाबींचा विचार करता मा. आयुक्त यांचेसमवेत दि.२६/०९/२०१८रोजी समक्षतेत झालेल्या चर्चेचे अनुषंगाने मंजूर मक्तेदार दास ऑफ़शोअर इंजि. प्रा. लि. मुंबई यांचे समवेत तातडीने रितसर करारपत्र करुन त्यांना वर्क ऑर्डर देणेंस तसेच वर्कऑर्डरमध्ये " मा. उच्च न्यायालयांचे अंतिम निर्णयांस अधिन राहून वर्कऑर्डर देणेंत येत आहे " अश्या प्रकारे नमूद करणेंस मा. आयुक्त यांची मान्यता मिळणेंस विनंती आहे.

मा.क.दि.२८/०९/२०१८.
सोबत - संदर्भिय पत्रे व मूळ मक्ता मंजूर प्रकरण.

Hibare 28/09/18.
प्र. सहा. अभियंता (ड्रेनेज)

28/09
उप अभियंता (ड्रेनेज)

28/9/18
प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता

२८.९.१८.
मा. आयुक्त

E:\Hibare 18 a\Amrut\Stnd\SD MC 1.doc

Scanned by CamScanner